# पालकमंत्री अजित पवार यांनी बीडकरांना वाऱ्यावर सोडले, पाण्याअभावी बीडकरांचे हाल..!

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564




■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - २२५ ■ रविवार दि.४ मे २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 225 ■ Sunday Dt.4 May 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# बीड नगरपरिषदेचे अनेक मुख्याधिकारी बदलले परंतु बीडकरांना पाणी देण्यात अपयशी ठरले

## शासनाचा पगार घेऊन बसलेल्या एकही मुख्याधिकाऱ्यांना बीड शहरातील पाणी प्रश्न मार्गी लावता आला नाही?

### लोकप्रतिनिधी व नेत्यांनी पाण्याचं राजकारण केलेच पण प्रशासन म्हणून मुख्याधिकाऱ्यांनीही काही उपयोजना केल्या नाहीत?

### बीड शहराला पाणी पुरवण्यास बीड नगरपरिषद प्रशासन स्पेशल फेल; बीडकरांची तहान आणि घशाची कोरड?

### बीड शहरात पाण्याचा प्रश्न गंभीर, आगामी काळात तरी तो सुटेल की नाही? ठामपणे कोणाला सांगता येईना!

बीड । प्रतिनिधी

बीड नगरपरिषदेतील अनेक मुख्याधिकारी बदलले, परंतु बीड शहरातील पाणी प्रश्न अजूनही तसाच आहे. अनेक वर्षांपासून हेच सुरू आहे, आणि नागरिकांना पाण्याची समस्या भेडवत आहे. सध्याच्या परिस्थितीत पिण्याच्या पाण्याचा मोठा प्रश्न आहे. मागील अनेक वर्षांपासून हेच सुरू आहे आणि अनेक मुख्याधिकारी बदलूनही परिस्थिती सुधारलेली नाही. गेल्या अनेक वर्षांत अनेक मुख्याधिकारी बदलले आहेत, परंतु पाणी प्रश्न तसाच आहे. यामुळे नागरिकांमध्ये असंतोष आहे. यावर एकही लोकप्रतिनिधी किंवा पुढारी बोलायला तयार नाहीत. शहरातील नागरिकांनी घराघरात नळ घेतला परंतु त्याला महिनोन्महिने पाणी येत नाही. सध्या उन्हाळा आहे आणि उन्हाच्या कडाक्यातच बीड शहरांना पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. नागरिकांना भर उन्हाळ्यात विकतचे पाणी घेऊन तहान भागावी लागत आहे. प्रशासन आणि लोकप्रतिनिधी व नेते यावर ब्र शब्दही काढायला तयार नाहीत. गेल्या ३२ वर्षात ५१ मुख्याधिकारी आले. पण बीडकर अजूनही पाण्याविना तहानलेले आहे. लोकप्रतिनिधी व नेत्यांनी तर पाण्याचं राजकारण केलेच पण प्रशासन म्हणून मुख्याधिकाऱ्यांनीही यासाठी काही उपाययोजना केल्या नाहीत.

कडक उन्हाळयाच्या पार्श्वभूमीवर पाण्याचा तुटवडा भासत आहे. नागरिकांना विकतच्या पाण्यावर अवलंबून राहण्याची वेळ आली आहे. कडक उन्हाळ्यात पाण्याच्या या संकटामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. बीड शहरात पाण्याचा प्रश्न गंभीर बनला असून, आगामी काळात तरी तो सुटेल की नाही? याबाबत अद्यापतरी ठामपणे कोणालाच सांगता येईना झाले आहे. महिनाभरापासून नळाला पाणी आलेले नसल्याने नागरिकांची




पाण्यासाठी तारांबळ होत आहे. बीडकरांची तहान आणि घशाची कोरड हे लोकप्रतिनिधी प्रशासन मारेकरी आहेत. उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांनी बीडकरांना वाऱ्यावर सोडले असून पाण्याअभावी बीडकरांचे हाल होताना दिसत आहे. सध्याच्या काळात बिडकर यांना तीव्र पाणीटंचाई सामोरे जावे लागत आहे. बीडच्या पाणीपुरवठ्यासाठी फक्त बैठकांचा फार्स होत आहे. शहरातील नियमित व सुरळीत पाणीपुरवठा करण्याची मागणी बीडकर करत आहे. एक महिन्यापासून बीड




करांच्या नळाला पाणी नाही. रखरखत्या उन्हात सूर्य आग ओकत असताना. बीडकरांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे. हे लोकप्रतिनिधी व नेत्यांना आणि नगरपरिषद प्रशासनाला दिसत नाही का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. कडक उन्हाळ्याच्या काळात बीडकरांना पाणी टंचाईचा सामना करण्याची वेळ आली आहे. नागरिकांचे पाण्यासाठी हाल होत असून पाणी नसल्याने नागरिकांची भटकंती सुरू आहे. शहरात पाण्यासाठी बोंबाबोंब सुरू असून पाणी पुरवठा होत नसल्याने

▶ पान २ वर

## भोगलवाडी प्रा.आ.केंद्रातील डॉक्टरसह आरोग्य कर्मचारी सतत गैरहजर; वरिष्ठांचे दुर्लक्ष

तेलगाव । प्रतिनिधी

भोगलवाडी प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्यासह आरोग्य कर्मचारी सतत गैरहजर राहत असल्याने उपचारार्थ येणाऱ्या रूग्णांची गैरसोय होत असुन, नाइलाजास्तव रूग्णांना खाजगी रुग्णालयात जावे लागत लागते. याकडे तालुका वैद्यकीय अधिकाऱ्यासह वरिष्ठ आरोग्य अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष असल्याचे दिसत आहे. तरी आरोग्य विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गैरहजर डॉक्टरसह कर्मचाऱ्यांवर कारवाई न केल्यास आंदोलन करण्यात येईल, असा इशारा भोगलवाडीसह परिसरातील नागरिकांनी दिला आहे.

यासंदर्भात माहिती अशी की, भोगलवाडी ता.धारूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात सध्या कार्यरत असलेले वैद्यकीय अधिकारी हे सतत गैरहजर असतात. ते कधी तरी मन मानेल त्या दिवशी दवाखान्यात येतात. कांही वेळ थांबून लगेच जातात.ते




सतत गैरहजर राहत असल्याने येथील कर्मचाऱ्यांवर त्यांचा कसलाच अंकुश नाही. त्यामुळे कर्मचारीही मनमानी करत आहेत. वैद्यकीय अधिकारीच गैरहजर राहतात. त्यामुळे कर्मचारी सुध्दा सतत गैरहजर राहत असल्याचे दिसुन येते. डॉक्टरसह आरोग्य कर्मचारी गैरहजर राहतात त्यामुळे येथे उपचारार्थ भोगलवाडी व परिसरातुन येणाऱ्या रूग्णांवर उपचार करण्यास या प्राथमिक आरोग्य केंद्रात कुणीच नसल्याने रूग्णांना विना उपचार परत फिरावे लागते, असे प्रकार अनेक वेळेस झाले असल्याने हे प्रा.आ.केंद्र असुन अडचण, नसुन खोळंबा, अशी अवस्था होत आहे. डॉक्टर व कर्मचाऱ्यांच्या गैरहजर राहण्याकडे धारूरचे तालुका वैद्यकीय अधिकारी यांचे कायम दुर्लक्ष असुन, ते का दुर्लक्ष करून त्यांने का पाठीशी घालतात. असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

याबाबत आरोग्य विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दखल घेऊन, भोगलवाडी प्रा.आ.केंद्रातील गैरहजर डॉक्टरसह कर्मचाऱ्यांवर कडक व दंडात्मक कारवाई करावी. अन्यथा यासाठी नागरिक भोगलवाडी प्राथमिक आरोग्यास कुलूप ठोकतील, असा इशाराही नागरिकांनी दिला आहे.

## एसपींच्या निवासस्थानी गांजा पिताना पोलीस कर्मचाऱ्याला रंगेहात पकडले

बीड । प्रतिनिधी

बीड-पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत यांनी अवैध धंद्दे आणि गैरकारभारावर निर्बंध आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले असताना दुसरीकडे त्यांच्याच खात्यातील कर्मचारी कायदा आणि सुव्यवस्थेचे धिंडवडे काढत आहेत. अन्य कुठेनव्हे तर थेट पोलीस अधिक्षक यांच्या निवासस्थानीच काल (दि. ४) रात्री ९ ते ९.३० च्या दरम्यान एका कर्मचाऱ्याला एसपींनीच गांजा पिताना रंगेहात पकडले. या प्रकारामुळे आता पोलीस दलाचीच प्रतिमा मलीन होत असून रोजच्या घटनांनी जिल्हयातील पोलीस दलाची बदनामी कमी होते की काय त्यात नव्याने भर पडली आहे.

शिवाजी नगर पोलीस ठाण्यातील पोलीस निरीक्षक मारुती खेडकर यांनी दिलेल्या माहितीनुसार बाळू बहिरवाळ असे त्या कर्मचाऱ्याचे नाव आहे. सध्या पोलीस अधिक्षक यांच्या निवासस्थानच्या डागडुजीचे काम सुरु असल्याने ते सध्या गेस्ट हाऊसमध्ये मुक्कामी आहेत. काल रात्री ९ ते ९.३० च्या दरम्यान ते आपल्या कुटुंबासह घराचे काम पाहण्यासाठी गेले होते. यावेळी बाळू बहिरवळ हा दरवाजा लाऊन आता गांजा पित होता. पोलीस अधीक्षकांनी स्वतः खूप वेळ दरवाजा ठोठावून ही दार उघडत नसल्याने त्यांना शंका आली. काही वेळानंतर बाळूने दरवाजा उघडला तेंव्हा आत गांजाचा वास आला. दरम्यान तात्काळ पोलीस अधिक्षक यांनी शिवाजी नगर पोलिसांना बोलावून बाळू बहिरवाळची जिल्हा रुग्णालयात तपासणी करण्याचे आदेश दिले. यावेळी बाळूने गांजाचे सेवन केल्याचे अहवालातून समोर आल्यानंतर त्याच्यावर शिवाजी नगर पोलीस ठाण्यात एनडीपीएस ॲक्ट नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. दरम्यान आरोपीला सेवेतून निलंबित करण्यात आल्याची देखील माहिती असून थेट पोलीस कर्मचारीच कायद्याचे पालन करणार नसतील तर जिल्हयात खाकीचा धाक राहणार कसा? हा प्रश्न आता निर्माण होत आहे.



# थंडपेय, चायनीज विक्रेत्यांचा सुळसुळाट

## अन्न व औषध प्रशासनाचे दुर्लक्ष : नागरिकांचे आरोग्य आले संकटात

पात्रुड । प्रतिनिधी

जिल्ह्यात सध्या उन्हाळ्याची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असून सुटच्यांमध्ये खाद्यपदार्थांचा आस्वाद घेणाऱ्यांत भर पडते. बाजारपेठेत थंडपेय, चायनीज खाद्यपदार्थ आणि हातगाडीवर मिळणाऱ्या फास्टफूड विक्रेत्यांचा सुळसुळाट झालेला आहे. मात्र या विक्रेत्यांकडून वापरले जाणारे पाणी, बर्फ, तेल व खाद्यपदार्थांची गुणवत्ता, स्वच्छता आणि परवाना तपासणीबाबत अन्न व औषध प्रशासनाचे स्पष्ट दुर्लक्ष दिसून येत आहे. यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर संकट ओढवण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

रस्त्यांच्या कडेला, चौक–चौरस्त्यांवर अनेक ठिकाणी फेरीवाले, स्टॉलधारक बिनधास्तपणे खाद्यपदार्थ, थंडपेय, सरबत, मिल्कशेक, कुल्फी, बर्फाचे गोळे, फळाचा ज्युस, रसवंती यांची विक्री करीत आहेत. अनेक विक्रेत्यांकडे व्यवसायासाठी आवश्यक असलेला अन्न विक्री परवाना नाही, तर काहींनी परवाना घेतला असला तरी नविनीकरण केलेले नाही. शुद्धतेकडे दुर्लक्ष बहुतेक विक्रेते स्थानिक विहिरी, बंधारे किंवा बोअरवेलमधून थेट नळाने पाणी खेचून सरबत, रस किंवा बर्फ बनवतात. हे पाणी कोणत्याही शुद्धीकरण प्रक्रियेविना वापरले जाते, तसेच वापरण्यात येणाऱ्या बर्फाच्या घनतामापनाची व त्यात वापरण्यात आलेल्या पाण्याच्या गुणवत्तेची कोणतीही तपासणी होत नाही. अनेक वेळा बर्फ उघड्यावर साठवला जातो. त्यावर धूळ बसलेली असते, आणि तोच बर्फ ग्राहकांना दिला जातो. तेलाचा पुनर्वापरः फास्टफूडच्या स्टॉलवर वापरण्यात येणारे तेल अनेकदा पुन्हापुन्हा वापरले जाते. त्यामुळे त्यात टॉक्सिक घटक निर्माण होतात, जे शरीरातील यकृत, पचनसंस्था आणि हृदयावर घातक परिणाम करतात. शिवाय नूडल्स, मंच्युरियन, शेजवान सॉससाठी वापरण्यात येणारे घटक खुले बाजारातून स्वस्तात घेतले जातात. अनेक वेळा त्यांचा दर्जा शंकास्पद असतो.

**कायदा काय सांगतो ?**

'अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम २००६' अंतर्गत प्रत्येक विक्रेत्याने परवाना घेणे आवश्यक आहे. तसेच त्याचं नूतनीकरण वेळच्या वेळी होणे गरजेचे आहे. कोणत्याही अन्न विक्रेत्याकडे वैध परवाना नसेल, स्वच्छता आणि दर्जा पालन नसेल तर त्यांच्यावर कारवाई करता येते. मात्र बीड जिल्ह्यात अशा कारवायांची संख्या निरंक आहे. अन्न व औषध प्रशासनाने आणि आरोग्य विभागाने संयुक्त मोहीम राबवून अशा विक्रेत्यांवर तपासणी करावी, बिनपरवाना विक्रेत्यांवर दंडात्मक कारवाई करावी, तसेच नियमितपणे स्वच्छता आणि दर्जा तपासणी केली जावी.

**प्रशासन झोपेत का ?**

थेट रस्त्यावर, चौकात, उघड्यावर अन्न तयार करणाऱ्या आणि विकणाऱ्या विक्रेत्यांवर अन्न व औषध प्रशासन किंवा पालिका आरोग्य विभागाच्या कोणत्याही कारवाईची नोंद नाही. उन्हाळ्याचे दिवस असले की, या विक्रेत्यांची संख्या वाढते. बीड जिल्ह्यातील शहरासह ग्रामीण भागात थंडपेय व फास्टफूड विक्रेत्यांचा व्याप वाढलेला आहे. अनेक ठिकाणी अन्नपदार्थ उघड्यावर साठवले जात आहेत. आरोग्य विभागाच्या माहितीनुसार, उन्हाळ्यात पाण्याच्या किंवा बर्फाच्या अस्वच्छ वापरामुळे गॅस्ट्रोएन्टेरायटिस, डायरिया, हिपॅटायटिस ए/ई. फूड पॉइझनिंग, ताप, काविळसारखे आजार वाढतात. विशेषतः लहान मुले, वृद्ध आणि आजारी व्यक्तींसाठी ही स्थिती अतिशय धोकादायक ठरते.

> "सध्या वाढत्या तापमानामुळे थंडपेयांची गरज वाढली असली, तरीही नागरिकांनी फक्त विश्वासार्ह, स्वच्छता राखणाऱ्या दुकानदारांकडूनच अशा गोष्टी विकत घ्याव्यात. लहान मुलांबरोबर खाद्यपदार्थांचा आस्वाद घेताना उघड्यावर विकल्या जाणाऱ्या शिळ्या व अस्वच्छ अन्नपदार्थांचा वापर टाळावा. अन्न औषध प्रशासनानेही परवाना तपासणी करणे गरजेचे आहे.
>
> – शेख जावेद, सामाजिक कार्यकर्ता

> "उन्हाळ्यात अन्नापाण्यातून विषबाधा जंतसंसर्गाचे प्रमाण वाढते. विशेषतः उघड्यावर विकल्या जाणाऱ्या थंडपेयांमध्ये वापरला जाणारा बर्फ, तसेच चायनीज किंवा तत्सम खाद्यपदार्थांमध्ये वारंवार गरम केलेले तेल, व स्वच्छतेचा अभाव ही प्रमुख कारणं आहेत. संसर्गाचे गंभीर परिणाम टाळण्यासाठी सतर्क राहणे गरजेचे आहे.
>
> – अन्सारी समीयोदीन, पात्रुड

# बीडचा पाणी प्रश्न तत्काळ सोडवा; पालकमंत्री ना.अजित पवारांच्या जिल्हाधिकाऱ्यांना सूचना

## डॉ.योगेश क्षीरसागरांच्या मागणीची दखल; लवकरच पाणी टंचाई दूर होण्याची अपेक्षा

बीड । प्रतिनिधी

शहरातील गंभीर पाणी टंचाईच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्याशी चर्चा करून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली. या मागणीची गंभीर दखल घेत पालकमंत्री अजितदादा पवार यांनी तत्काळ बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांना फोन करून आवश्यक त्या सूचना दिल्या आहेत. त्यामुळे शहरातील पाणी टंचाई दूर होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.





बीड शहरातील नागरिकांना गेल्या काही महिन्यांपासून नियमित आणि वेळेवर पाणी मिळत नसल्यामुळे त्रास सहन करावा लागत आहे. या समस्येच्या समाधानासाठी विविध स्तरांवर प्रयत्न सुरू आहेत. नागरिकांची भावना लक्षात घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी हा प्रश्न पालकमंत्री अजितदादा पवार यांच्यासमोर मांडला. त्यानंतर अजितदादा यांनी दिलेल्या सूचनांनुसार प्रशासनाकडून पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी यंत्रणा सक्रिय झाली आहे. प्रशासनाकडून लवकरच पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी पावले उचलण्यात येणार असल्याची माहिती मिळत आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांतून समाधान व्यक्त होत असून, लवकरच शहरातील पाणी टंचाई दूर होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# छत्रपती मल्टी स्टेट बँकेच्या जाचास कंटाळून २६ वर्षीय तरुणांची आत्महत्या

## केज तालुक्यातील कोरेगाव येथील घटना

मस्साजोग । प्रतिनिधी

केज तालुक्यातील कोरेगाव येथील एका बीएसी ग्री झालेल्या सव्वीस वर्षीय तरुणाने केज छत्रपती मल्टीटेट बँकेच्या जाचास कंटाळून राहत्या घरी पॉईजन या नावाचे औषध प्राशन करून आत्महत्या केल्याची घटना दिनांक ३ मे शनिवार रोजी सकाळी नऊ वाजता उघडकीस आली. सुरज याने औषध प्राशन केल्याचे माहिती होताच त्याला उपचारांसाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले मात्र डॉक्टरांनी त्याची तपासणी करून त्याला मृत घोषित केले. या घटनेने कोरेगाव परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.



आत्महत्या केलेल्या तरुणांचे नाव सुरज शिवाजी तांदळे असे आहे. या तरुणांने वारंवार केज, गेवराई , बीड येथील छत्रपती मल्टी को ऑपरेटिव्ह सोसायटी बँक येथील शाखेत वारंवार चकरा मारून सुध्दा आपण गुंतवणूक केल्याले एक लाख रुपयांची रक्कम मिळत नसल्यामुळे माणसीक नैराश्यातून टोकाचे पाऊल उचलून आपले जीवन संपवले आहे .तरी नवनिर्वाचीत जिल्हाधिकारी यांनी या प्रकरणात लक्ष घालून संबंधित बँकेच्या संचालकांविरुद्ध कारवाई करण्याची व तांदळे परिवाराला न्याय मिळवून देण्याची मागणी परिसरातून होत आहे.

# नागरिकांना वेठीस धरणाऱ्या मुख्याधिकारी यांचेवर कार्यवाही करून पाणी पुरवठा तात्काळ सुरळीत करा : नगरसेवक अॅड विकास जोगदंड

बीड । प्रतिनिधी



एकेकाळी बीड नगर परिषद नागरी सुविधा पुरविण्या साठी तत्पर आणि इतर नगर परिषदेने आदर्श घ्यावा अशी आदर्शवत होती परंतु मागील चार वर्षाच्या प्रशासकाच्या कार्यकाळात त्यातली त्यात मुख्याधिकारी निता अंधारे यांच्या कार्यकाळात भ्रष्ट, ढीसाळ, आणि अनागोंदी कारभाराने उच्चांक गाठला आहे केवळ टक्केवारीत धन्यता मानणाऱ्या मानवी संवेदना नसलेल्या नगर परिषद प्रशासनाला शहरातील नागरिकांचे काहीच देणे घेणे नाही. नगर परिषद प्रशासन कुठल्या जन्माचा सूड उगावत आहे. भर उन्हाळयाच्या दिवसात शहरातील नागरिकांना पाण्यासाठी वनवण भटकावे लागत आहे. शहरातील माता, भगिनीं, बांधवांची पाण्यासाठी मोठी परवड होत आहे.

बीड शहराला पाणी पुरवठा करण्यात येणाऱ्या बिंदुसरा धरण आणि माजलगाव धरणात मुबलक पाणी साठा असतांना ही जाणीवपूर्वक पाईप जोडणी चे कारण पुढे करत बावीस दिवसापासून शहरातील नागरिकांना पाण्यापासून वंचीत ठेवण्यात आले आहे. यांस सर्वस्वी मुख्याधिकारी निता अंधारे तसेच नगर परिषद प्रशासन जबाबदार असून त्यांचेवर कठोर कार्यवाही करून बीड शहराला तात्काळ सात दिवसआड सुरळीत पाणी पुरवठा करून जाणीवपूर्वक निर्माण केलेली पाणी टंचाई दुरु करण्यात यावी अशी मागणी भिम स्वराज्य सेनेचे संस्थापक/अध्यक्ष तथा माजी नगरसेवक ड विकास जोगदंड यांनी जिल्हाधिकारी यांचेकडे निवेदनातून केली आहे.

# कारच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

परळी–वैजनाथ । प्रतिनिधी

परळी–गंगाखेड रोड वरील कारने दुचाकीला धडक दिल्याने गंभीर जखमी झालेले दुचाकीस्वार रामभाऊ वैजनाथ बिडगर (वय ४०, रा. दाऊतपूर) यांचा उपचारादरम्यान रविवारी मृत्यू झाला. परळीतील घरणीकर रोडवर रामभाऊ बिडगर यांचे चहाचे हॉटेल आहे. २ मे रोजी रात्री नऊच्या सुमारास हॉटेल बंद करून ते दुचाकीवरून दाऊदपूरकडे घरी जाताना परळी ते गंगाखेड रस्त्यावर थर्मल कॉलनीच्या गेटजवळ भरधाव कारने त्यांच्या दुचाकीला धडक दिल्याने अपघात झाला होता. काही सामाजिक कार्यकर्ते व पोलिसांनी जखमी बिडगर यांना उपजिल्हा रुग्णालयात नेले. तेथून पुढे अंबाजोगाईच्या स्वाराती रुग्णालयात दाखल केले. उपचारादरम्यान रविवारी दुपारी त्यांची प्राणज्योत मालवली. याप्रकरणी संभाजीनगर ठाण्यात गुन्हा दाखल झालेला नव्हता. फिर्याद दाखल झाल्यास गुन्हा नोंदविण्यात येईल, अशी माहिती संभाजी पोलिस निरीक्षक धनंजय ढोणे यांनी दिली. विशेष म्हणजे ज्या कारने दुचाकीला धडक दिली, ती कार काही तासाने गंगाखेड रोडवर जळालेल्या अवस्थेत दिसून आली. कारला आग लागल्याचे समजताच नगरपालिका अग्निशमन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी पोहोचून आग नियंत्रणात आणली. परळी गंगाखेड रोडवर ज्या कारने धडक दिली त्या कारमध्ये असलेल्या जीसीआरमधील महापारेषण वीज कर्मचाऱ्यांचा नशेच्या अवस्थेतील व्हिडीओ व्हायरल झाला आहे. बेधुंदपणे कार चालवून रामभाऊ बिडगर यांच्या मृत्यूस जबाबदार असणाऱ्या कारचालकावर कडक कारवाई करण्याची मागणी दाऊतपूर येथील दगडूभाळे यांनी केली आहे.

### टीसी हरवला आहे

वळे अजिंक्य अशोक या नावाचा १२ वी पासचा टीसी बीड ते संभाजीनगर प्रवासात हरवला आहे. कोणाला सापडल्यास ७३८५३३६७३६ या नंबरवर संपर्क साधा.

संपर्क

**वळे अजिंक्य अशोक**

७३८५३३६७३६

पान १ वरून...

### बीड नगरपरिषदेचे अनेक मुख्याधिकारी बदलले...

नागरिकांतून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. याकडे लक्ष देण्यासाठी लोकप्रतिनिधींना आणि प्रशासनाला वेळ नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. दिवसेंदिवस बीड शहराचा पाणी प्रश्न गंभीर होत चालला आहे. याकडे लोकप्रतिनिधी व विविध पक्षांचे नेते यांचेही लक्ष नाही. सध्या नगरपरिषद प्रशासनाकडूनही लक्ष दिले जात नाही. अशा परिस्थितीमध्ये पाण्यासाठी बीडकरांचे हाल होत आहेत. ऐन उन्हाळ्यात बीड शहरात महिन्यातून एकदाच पाणीपुरवठा होत असल्याने, बीडकरांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी व प्रशासन बीडकरांच्या मूलभूत प्रश्नाकडे डोळेझाक करत असल्याचे देखील दिसत आहे.

# दिव्यत्वाची जेथे प्रचिती/ तेथे कर माझे जुळती

आपला बीड जिल्हा ऐतिहासिक राजकीय सामाजिक गौरवशाली परंपरा लाभलेला जिल्हा आहे. आपल्या बीड जिल्ह्याने राजकीय सामाजिक औद्योगिक शैक्षणिक अध्यात्मिक क्षेत्रामध्ये नेहमीच नाव कमावलेले आहे. बीड जिल्ह्याचे भाग्य एवढंच की प्रत्येक कठीण परिस्थितीला भेदण्यासाठी जिल्ह्यातील भूमिपुत्र नेहमी काम करत असतात. आणि अशा व्यक्तींचा बीड जिल्ह्यातील जिल्हावासीयांना अभिमानच असायला हवा. बीड जिल्ह्यातील काही राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, अध्यात्मिक, क्षेत्रातील मंडळी नेहमीच बीड जिल्ह्याचा गौरव वाढवण्याचा प्रामाणिक प्रयत्न करत असतात. आणि त्यातीलच एक नाव म्हणजे मा.श्री.शांतीलालजी मुथा (राष्ट्रीय अध्यक्ष, भारतीय जैन संघटना) भारतीय जैन संघटना म्हणजे बीडला पडलेले एक सुंदर स्वप्न होय. बीड जिल्हा हा तसा दुष्काळी म्हणून गणला जातो. भरपूर प्रमाणात पाऊस पडून देखील नद्यांची पाणी धारण क्षमता गाळ असल्यामुळे कमी होत चालली आहे. त्यामुळे ज्या वेगाने पाऊस पडतो त्याच वेगाने पाणी निघून जाते आणि पुन्हा जिल्ह्याला दुष्काळी परिस्थितीला तोंड द्यावे लागते. याचा विचार करून महाराष्ट्र शासन व भारतीय जैन संघटना यांच्या गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार या योजनेचा शुभारंभ व 'नाला खोलीकरण व नाला रुंदीकरण या योजनेचा शुभारंभ' ५ मे २०२५ रोजी होत आहे. यानिमित्त जलरथ यात्रेचे उद्घाटन बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी श्री विवेक जी जॉन्सन यांच्या शुभहस्ते मान्यवरांच्या उपस्थित होत आहे. भारतीय जैन संघटना या योजनेच्या माध्यमातून नाल्यातील गाळ स्वखर्चाने शेतकऱ्यांना वितरित करीत आहे. व शेतकऱ्यांना गाळ घेऊन जाण्यासाठी प्रोत्साहित करत आहे.या योजनेचा सर्व गावकऱ्यांनी लाभ घ्यायला हवा. बीड जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती नष्ट होऊन जिल्हा सुजलाम सूफलांम व्हावा यासाठी भारतीय जैन संघटनेने पुढाकार घेतलेला आहे. बीड जिल्ह्याचे राष्ट्रीय अध्यक्ष माननीय श्री शांतीलालजी मुथा हे एक बीड जिल्ह्याचे वैभव आहे. अतिशय संस्कारशील सुस्वभावी आणि नैतिकतेचे भान असणारे डोंगर किन्ही तालुका पाटोदा येथील शांतीलालजी मुथा मानवतेचे दूत आहेत. सातत्याने मनामध्ये २४ तास समाजाविषयी तळमळ आणि समाजाच्या भल्याविषयी विचार असतात. जनकल्याण करण्याचा शुद्ध हेतू त्यांच्या मनामध्ये असतो. माणसाने आपल्या जीवनामध्ये समाजाविषयी आपले ऋण व्यक्त करण्याचा प्रयत्न करायला हवा. या समाजाचे आपण काहीतरी देणं लागतो या हेतूने समाजकार्यामध्ये आपण सहभागी असायला हवं. जो न कर सके जनकल्याण उस नर से अच्छा पाषाण असं म्हटलं जातं. संतांनी विचारवंतांनी अध्यात्माने आपल्याला समाजाविषयी कृतज्ञ राहण्याचे संस्कार दिले आहे त्याप्रमाणे आपण आपला जीवितार्थ चालवत असताना समाजाचेही काही काम केलेच पाहिजे. निदान समाजाप्रती जे समर्पित व्यक्तिमत्त्व आहेत, जे समाजाचे हित करू इच्छितात त्यांच्यासोबत त्यांच्या पाठीमागे आपण खंबीरपणे उभे राहून त्यांना सहकार्य करण्याची भूमिका आपली असायला हवी. रामायणामध्ये राम सेतू बांधता वेळेस जी खारुताईची भूमिका आहे निदान त्या शुद्ध हेतूने तरी आपण आपले कार्य समाजाप्रती केलेच पाहिजे. आदरणीय श्री शांतीलाल मुथा यांचे कार्य खूप मोठे आहे त्यांच्या कार्याला आपण सहकार्य केलेच पाहिजे. भारतीय जैन संघटना ही सामाजिक संघटना असून त्या माध्यमातून खूप सामाजिक उपक्रम या संघटनेने राबवलेले आहेत. पावसाचे पडलेले पाणी वाहून जाऊ नये या ठिकाणीं नाला खोलीकरण व नाला रुंदीकरणाचा उपक्रम महाराष्ट्र शासनाचा असून भारतीय जैन संघटना जनकल्याणासाठी शेतकऱ्यांना गाळ घेऊन जाण्यासाठी प्रोत्साहित करत आहे.. पूरजन्य परिस्थिती निर्माण झाल्यामुळे तलावात गाळ साचतो आणि तलावाची पाणी धारण क्षमता कमी होते पर्यायाने पुन्हा दुष्काळाला सामोरे जावे लागते म्हणून भारतीय जैन संघटनेने जवळपास ११३ तलाव मधला गाळ बीड जिल्ह्यामध्ये या संघटनेने काढलेला आहे. स्त्रीभ्रूणहत्या हा अत्यंत ज्वलंत असा विषय. आपली संस्कृती आपल्याला सांगते यत्र नार्यस्तू पूज्यते रमंते तत्र देवता: ज्या ठिकाणी नारीचा, महिलांचा सन्मान केला जातो त्या ठिकाणी देवता रममान होत असतात.परंतु अलीकडे काळात स्त्री जन्मदर घटत असल्याचे आपण पाहतो. परंतु १९८० मध्ये शांतीलाल मुथा यांनी मुलीचे जन्मदर घटत असल्याचा मुद्दा अधोरेखित केला होता. स्त्रियांना मुलींना दुय्यम दर्जा दिला जात असल्याचे खंत व्यक्त होत असते.मुलींचे पालन पोषण हा पालकांना खूप किचकट असा प्रश्न वाटतो त्यांचे शिक्षण त्यांचा विवाह, ही अडचण लक्षात घेऊन भारतीय जैन संघटनेने सर्व धर्मीय सामूहिक विवाह सोहळे जवळपास ७५० विवाह करून जागतिक रेकॉर्ड केला आहे. आणि सामूहिक विवाह सोहळ्यामुळे पालकांचा बराचसा खर्च कमी होतो म्हणून सातत्याने सामुहिक विवाह सोहळ्याला नेहमी प्रोत्साहन दिले आहे. विवाह पवित्र संस्कार असून यामुळे सामाजिक घडी बसण्यासाठी मदत होते.



महाराष्ट्रामध्ये लातूर जिल्ह्यातील किल्लारी येथे महाप्रलय कारी भूकंप झाला होता व त्या ठिकाणी अनेक लोक बेघर झाले होते. अशा बिकट परिस्थितीची परिणामकारकता शांतीलाल मुथानी अनुभवली. तेथील १२५० मुलांना सोबत घेऊन पुणे जिल्ह्यातील वाघोली येथे त्यांचे पुनर्वसन केले. त्यांची संपूर्ण जिम्मेदारी पालक या नात्याने त्यांनी घेतली त्या अनाथ मुलांना आधार दिला आपुलकीने मायेने प्रेमाने त्यांना वाढवले. उच्च विद्या विभूषित केले. त्यांना त्यांच्या पायावर उभे केले व समाजाच्या मुख्य प्रवाहात आणले त्यांच्या कार्याची दखल दोन पंतप्रधान व दोन राष्ट्रपतींनी घेतली. असे हे महान कार्य त्यांनी केले. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा एक ज्वलंत विषय त्यांनी आत्महत्याग्रस्त कुटुंबाला आधार दिला तसेच आदिवासी परिसरातील मुलांना उच्च दर्जाचे शिक्षण देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. आत्महत्याग्रस्त कुटुंबातील आधार गेल्यावर ते कुटुंब वाऱ्यावर पडते याची जाणीव त्यांना आहे. त्या कुटुंबाला आधार देऊन त्या घरातील व्यक्तीला उच्चशिक्षित करणे व त्याला स्वतःच्या पायावर उभे करणे हे एकमेव ध्येय त्यांच्या समोर होते. जे का रंजले गांजले/ त्यासी म्हणे जो आपुले /तोचि साधू ओळखावा/ देव तेथेचि जाणावा अशा गरीब लोकांची जो सेवा करतो संत उक्तीनुसार देव त्याच ठिकाणी आहे. असा देव आपल्या बीड जिल्ह्याला लाभला हे आपले अहोभाग्यच. म्हणून म्हणावसं वाटतं दिव्यत्वाची जेथे प्रचिति तेथे कर माझे जुळते त्यांच्या कार्याला सलाम तर आहेच पण आपण देखील आपल्या पद्धतीने आपला स्वार्थ विसरून त्यांच्या कार्याला हातभार लावणे गरजेचे आहे. कारण श्रीकृष्ण परमात्म्याने जरी गोवर्धन उचललेला असला तरी गोपाळांनी आधार देण्याचे काम करणं आवश्यक आहे. गाळ मुक्त धरण व गाळयुक्त शिवार नाला खोलीकरण व रुंदीकरण या निमित्त निघालेल्या जलरथ यात्रेच्या माध्यमातून आपला आपल्या गावचा विकास करून घेऊया. आपणही या योजनेमध्ये सहभागी होऊया. भारतीय जैन संघटना सातत्याने सामाजिक उपक्रमासाठी नेहमी प्रोत्साहन देत असते. भारतीय जैन संघटना (बी.जे.एस.) च्या या सामाजिक उपक्रमाला खूप खूप शुभेच्छा. तसेच या उपक्रमाच्या माध्यमातून ज्यांचे सहकार्य ज्यांचा हातभार या योजनेसाठी लाभत आहे त्या सर्वांना सुख, समाधान,शांती,लाभो ईश्वर कृपा त्यांच्यावर सतत राहो हीच माऊली महाराजांच्या चरणी विनंती, प्रार्थना.

**श्री गलांडे सर**
**मो.९५६१२४९७६९.**
**(निवेदक,गेवराई)**

# माजलगाव शहरातील महेबुब नगर मध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करा

## समाज सेवक मुस्ताक कुरेशी यांची माजलगाव नगर परिषदेला मागणी




माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव शहरातील महेबुब नगर मध्ये ५ ते ६ महिने अगोदर याठिकाणी पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन चे काम करण्यात आले परंतु माजलगाव नगरपरिषद अंतर्गत रस्ते. नाल्या चे कामे चालू असून संबंधित गुत्तेदार यांनी ७ते ८ महिन्यापासून फोडून ठेवल्यामुळे महेबुब नगर मध्ये पिण्याच्या पाण्याची अडचण निर्माण झाली असून सध्या उन्हाळ्याच्या दिवस असल्यामुळे या ठिकाणी बोरवेल हातपंप यांचे पाणी पातळी खाली गेल्यामुळे महेबुब नगर येथील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी अडचण निर्माण झालेली असून याची दखल घेऊन तात्काळ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात यावी.

ताबडतोब त्या ठिकाणी टँकरद्वारे पाण्याची व्यवस्था करण्यात यावी. फोडलेली पाईपलाईन तात्काळ टाकण्यात यावी तसेच पाईप लाईन फोडणाऱ्या संबंधित गुत्तेदार यांची चौकशी करण्यात यावी. कारण आज आठ महिन्यापासून महेबूब नगर या ठिकाणचे पिण्याचे पाणी बंद झाले आहेत आणि त्या महेबुब नगर येथील नागरिक पिण्याच्या पाण्यासाठी वन वन फिरत आहेत महेबुब नगर येथील पाण्याची व्यवस्था लवकर करा व संबंधित गुत्तेदार यांने काहीच व्यवस्था केलेली नाही त्यामुळे त्या ठिकाणच्या नागरिकांना बोरवेलचे पाण्यामुळे आरोग्याला धोका निर्माण झाले आहे आजपर्यंत तहान भागवण्याचे काहीच साधन नाही म्हणून महेबूबनगरच्या नागरिकानी वारमार आंदोलन केले परंतु उन्हाळ्याच्या दिवस कडक असल्यामुळे बोरवेल चे पाणी पातळी खाली गेल्यामुळे पाणी पिण्यासा साठी भटकती करावे लागत आहे.

तसेच बोरवेलच्या पाण्यामुळे पाण्यासाठी भटकंती करावी लागत असून याची दाखल नं परीषद प्रशासनाने घेऊन तात्काळ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात यावी सध्या उन्हाळयाच्या दिवस असल्यामुळे महेबुब नगर या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची अत्यंत गरज असून त्याची सोय तात्काळ लावण्यात यावी व जोपर्यंत पाईपलाईनचे काम पूर्ण होत नाही तोपर्यंत टँकरद्वारे पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात यावे नसता लोकशाही मार्गाने विविध स्वरूपाचे आंदोलन आपल्या कार्यालय समोर करण्यात येईल अशी मागणी महाराष्ट्र युवक प्रतिष्ठान अध्यक्ष मुस्ताक कुरेशी यांच्या वतीने मा. जिल्हाधिकारी कार्यालय कडे ईमेल व्दारे मागणी करण्यात आली आहे.

# मुख्यमंत्री सुंदर माझी शाळा प्रथम क्रमांकाचे पाडळी हायस्कूलला तीन लाखाचे बक्षीस प्राप्त




शिरूर कासार । प्रतिनिधी

राज्यात मुख्यमंत्री सुंदर माझी शाळा अभियान प्रभावीपणे राबविले गेले यामध्ये अनेक शाळांनी सहभाग घेऊन आपली कला कौशल्य दाखविले त्याच अनुषंगाने शिरूर तालुक्यातून पाडळी हायस्कूल पाडळी या शाळेला मुख्यमंत्री सुंदर माझी शाळा तालुकास्तरीय प्रथम क्रमांकाचे तीन लाखांचे बक्षीस मिळाले होते आज महाराष्ट्र दिनी या बक्षिसांची रक्कम रोख चेकद्वारे मुख्याध्यापक तथा प्राचार्य अंगदराव दहिफळे सरपंच गहीनाथ पाखरे यांना गटविकास अधिकारी संजय केंद्रे गटशिक्षणाधिकारी संदीप शिंदे विस्तार अधिकारी शेख जमीर यांच्या हस्ते सुपूर्त करण्यात आली. मुख्याध्यापक तथा प्राचार्य दहिफळे यांनी अत्यंत मेहनतीने वर्षभर शाळेत वृक्षारोपण शाळा रंगरंगोटी बोलक्या भिंती म्हणी सुविचार थोर महापुरुषांची प्रतिमा विद्यार्थ्यांना भौतिक सुविधा आनंदी वातावरणात शिक्षण शाळा स्वच्छता विविध स्पर्धा मध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग आदि बाबींचे योग्य नियोजन करून प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळविले. या बक्षीस कार्यक्रमास केंद्र प्रमुख सुनील खेडकर, उच्च माध्यमिक पर्यवेक्षक भाऊसाहेब सोंडगे, माध्यमिक पर्यवेक्षक दिपक रत्नपारखी, आण्णा राऊत, मारुती धांडे, महेश उगलमुगले आदींची उपस्थिती होती. प्रथम क्रमांकाचे बक्षीस प्राप्त केल्याबद्दल संस्थेचे सचिव माजी मंत्री जयदत्तजी क्षीरसागर, प्रशासक डॉ. राजिवजी मचाले, सहप्रशासक योगेश पवार, कार्यवाहक एम ए राऊत आदींनी व ग्रामस्थांनी प्राचार्य दहिफळे यांचे अभिनंदन केले.

# सिद्धिविनायक कनिष्ठ महाविद्यालयाची यशस्वी निकालाची परंपरा कायम

बीड । प्रतिनिधी

सतत १० वर्ष विज्ञान शाखेचा १००% निकाल या वर्षि हि निकालात मुलींनीच बाज़ी मारली. इयत्ता बारावी परिक्षेचा२०२४-२५ चा निकाल विज्ञान शाखा १००% व कला शाखा १००%, विज्ञान शाखा विशेष प्राविण्यासह:- १३५ विद्यार्थी व प्रथम श्रेणी:- ३४ विद्यार्थी पास विज्ञान शाखा एकुण विद्यार्थी:१६९ तर कला शाखा विशेष प्राविण्यासह:- २३ विद्यार्थी, प्रथम श्रेणी:- ५८ विद्यार्थी व द्वितीय श्रेणी:-१ विद्यार्थी पास कला शाखा एकुण विद्यार्थी ८२ होते.विज्ञान शाखेतुन १) कु. पडदरिया तेजस्वी प्रदीप:-८९.५० % गुण घेवुन प्रथम क्रमांक मिळवला. २)तर द्वितीय क्रमांकावर यादव साक्षी दत्ता व आव्हाड हर्षदा हेमंत यांनी ८८.५० % गुण मिळविले व ३) तृतीय क्रमांक कु. पवार सई दीपक हिने:- ८८.३३% गुण घेवुन मिळवला.

कला शाखेतुन प्रथम कुलभैय्या सुवर्णमाला मनोहर:-८४.३३% , द्वितीय क्रमांक कु. गव्हाणे दुर्गा नवनाथ :- ८२.५०% तर तृतीय क्रमांक कु. गायकवाड वैष्णवी बाबुराव:- ८०.३३ % गुण घेवुन मिळवला. या यशा बद्दल संस्थेचे सचिव मा. आ. केशवरावजी आंधळे साहेब, अध्यक्ष श्री. राजाभाऊ वारे, उपाध्यक्ष श्री. संजयभाऊ आंधळे व संचालक श्री. रंजित भैय्या धस व इंजिनियर अशोक भैय्या आंधळे यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचार्यांचे कौतुक व अभिनंदन केले. तसेच प्राचार्य, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# मृत्यू टाळण्यासाठी वाहतूक नियमांचे काटेकोर पालन आवश्यक : दिपाली जाधव

अंबाजोगाई । प्रतिनिधी

रस्ते अपघात, मृत्यू हे टाळता येतात मात्र त्यासाठी परिवहन विभागाने दिलेले नियम काटेकोरपणे पाळणे आवश्यक आहे रस्त्याच्या कडेला असलेल्या सावधगिरी निर्देशक चिन्ह व माहिती देणारी चिन्ह याकडे वाहन चालकाचे तसेच सर्वसामान्य महिला, नागरिक यांचे लक्ष असावे लागते रस्त्याने पायी चालतानाही सावधगिरी बाळगणे जरुरीचे आहे. उजवी बाजू चालण्यासाठी असून रस्ते ओलांडताना वाहने पाहूनच तो ओलांडावा, असे मत लातूर येथील प्रादेशिक परिवहन अधिकारी दिपाली जाधव यांनी व्यक्त केले. योगेश्वरी शिक्षण




संस्था संचलित योगेश्वरी क्रीडा प्रबोधिनी, श्रीमती कमल खुरसाळे न्यास यांच्या वतीने आयोजित महिला आत्मभान प्रशिक्षण शिबिरात त्या बोलत होत्या.

अध्यक्षस्थानी योगेश्वरी क्रीडा प्रबोधिनीचे यांचे प्रमुख, संचालक आर.व्ही.सोनवळकर होते. त्यांनीही अध्यक्षीय समारोपात मनोगत व्यक्त केले. यावेळी दिपाली जाधव यांचे स्वागत योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या वतीने स्वागत करण्यात आले. संचालन राजकिरण पाटेकर तर आभार वैष्णवी वाघमारे हिने मानले. कार्यक्रमासाठी क्रीडा प्रबोधिनी सदस्य, प्राध्यापक, कर्मचारी उपस्थित होते.

# राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाच्या बीड जिल्हा कार्याध्यक्षपदी पत्रकार अनिल वैरागे यांची निवड

केज । प्रतिनिधी



केज शहरातील पत्रकार अनिल वैरागे यांची महाराष्ट्र राज्यात पत्रकारिता या क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाच्या बीड जिल्हा कार्याध्यक्ष या पदावर दिनांक ३० एप्रिल २०२५ पासून ते दि. ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या कार्याची दाखल घेऊनच त्यांना राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघामध्ये सहभागी करून घेण्याचा निर्णय घेण्यात आला.

संघामध्ये सहभागाबद्दल पत्रकार श्री.दत्तात्रय मुजमुले यांनी श्री.अनिल वैरागे यांचे हार्दिक अभिनंदन करत पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. महाराष्ट्र राज्य सचिव राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघ भारत यांच्या मार्फत अनिल वैरागे यांना नियुक्तीपत्रात देण्यात आले. दरम्यान अनिल वैरागे यांच्या निवडीचे सर्व स्तरातून स्वागत केले जात आहे.

# शेकडो विद्यार्थी अंधारात ठेऊन नियमबाह्य भरती

गेवराई । प्रतिनिधी

आम्ला ग्रामपंचायत गावातील जलमित्राच्या ३ जागा ग्रामपंचायत कार्यालय आम्ला बोर्डावर न लावता भरती घेण्यात आली. अर्जदार खरात सिदार्थ रखमाजी महोदय वरील विषयी विनंतीपूर्वक अर्ज करण्यात येतो की आम्ला ग्रामपंचायतचा भोंगळ कारभारावर पंचायत समितीमध्ये जलजीवन विभागामध्ये भरती प्रक्रियेवर कसल्याही प्रकारचे अटी तरतुदीचे पालन न करता कोणत्याही पदाची ग्रा.द्वारे माहिती न देता गावामध्ये भरती प्रक्रिया पाठीमागच्या रस्त्याने घेत आहे. तरी मा साहेबांना विनंती की, आपण या प्रक्रियेचा फेरविचार करुन पात्र उमेद्वारांना न्याय मिळवून देण्यात यावा व लवकरात लवकर जाहीर प्रगटन ग्रामपंचायत कार्यालय आम्ला येथे नोटीस बोर्डावर लावण्यात यावे इच्छुक उमेद्वार खरात सिध्दार्थ रखमाजी खरात



सुरज शिवाजी पठाण सोहेल बुहुन पठाण मुबीन अजिसखाँ, हागवणे संग्राम संजय बाळु डिगांबर झाडे, अर्जदार (तक्रारदार) खराम सिद्धार्थ रखमाजी. खालील लोकांना प्रतिलिपी म्हणजे कॉपी जाणार. स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) पंचायत समिती गेवराई २. ग्रामपंचायत अधिकारी, आम्ला ता. गेवराई जि. बीड यांना माहितीस्तव सादर करण्यात आले आहे.

# अंधारे मॅडम बीड शहरात अंधार करून जाणार का?

बीड । प्रतिनिधी

बीड नगरपालिका मध्ये मूर्खांचा बाजार एक महिना उलटू नही पिण्याच्या पाणी नळांना येत नाही. अंधारे मॅडम बीड शहरात अंधार करून जाणार का असा प्रश्न बीड शहर नागरिकांना पडलेला आहे. तरी लोक प्रतिनिधी एकही बोलायला तयार नाही व नगरसेवक यांना पण काही देणंघेणं राहिलाच नाही हा पाण्याचा प्रश्न येत्या बीड नगरपालिका निवडणूक वर परिणाम होणार हा निश्चित पणाने व बीड तालुक्यातील लोकप्रतिनिर्धीना त्यांची जागा दाखवल्याशिवाय बीड मतदार संघ नागरी स्वस्त बसणार नाहीत असा निश्चय करताना प्रहार जनशक्ती पक्ष बीड शहर अध्यक्ष दीपक पवार यांनी केला आहे.



# शिरूर कासार तालुक्याला खासदार व आमदार असून नसल्यासारखे असल्यामुळे शिरूर तालुक्याचा विकास होत नाही निदर्शनांदोलन भरउन्हात

शिरूर कासार । प्रतिनिधी

विषय राजुरी न. ते चिंचपूर इजदे या रस्त्यावरील हॉटेल अश्विमेघ वारणी ते तहसील कार्यालय शिरूर कानोबाची वाडी कदम वस्ती पर्यंतचे रस्त्याचे व पुलाचे काम तात्काळ पूर्ण करण्यात यावे म्हणून आज दिनांक ०५/०५/२०२५/ रोजी सकाळी ठीक दहा वाजता भर उन्हात शिरूर तालुक्यातील जनतेसाठी भूमी अभिलेख कार्यालय शिरूर कासार समोर बीड पाथर्डी रोड शिवसेना उद्धवजी बाळासाहेब ठाकरे या पक्षाच्या वतीने निदर्शन आंदोलन करण्यात आले शिवसेनेचे तालुकाप्रमुख सोपान काका मोरे शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख आजिनाथ भाऊ खेडकर शिवसेनेचे अल्पसंख्याक उपजिल्हाप्रमुख लालाभाई पठाण व सर्व शिवसैनिकांना घेऊन आज




आंदोलन करण्यात आले आहे. यापुढे या रस्त्याचे काम झाले नाही तर कोळवाडी चौकामध्ये तीव्र स्वरूपाचे आंदोलन शिवसेनेच्या वतीने करण्यात येणार आहे आता तरी कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग बीड हे महासे या गोष्टीकडे लक्ष देते व पावसाळयापूर्वी शिरूर तालुक्यातील शिरूर शहरासह सर्वच ग्रामीण भागातील रस्ते दुरुस्त करतील अशी अपेक्षा बाळगतो तसेही येणाऱ्या काळामध्ये भ्रष्ट अधिकाऱ्यांची सस्पेंड होण्याची माळ लागणार आहे. काळजी करू नका भ्रष्ट नेते करेप्टेड अधिकारी यांना जेलची हवा खावाच लागणार आणि दुर्भाग्य शिरूर कासार तालुक्याला खासदार व आमदार असून नसल्यासारखे आहे म्हणून शिरूर शहराचा तालुक्याचा विकास होत नाही तरी विधानसभेतील सभापतींकडे यांची तक्रार करण्यात येणार आहे.

# पंतप्रधान पिक विमा योजना राबविण्यासाठी महाराष्ट्र राज्यात कृषी पिक विमा महामंडळाची स्थापना करावी

बीड । प्रतिनिधी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समृद्ध शेतकरी आणि संरक्षित शेती या उद्देशाने केंद्र सरकार द्वारे २०१५-१६ पासून सुरू केलेल्या पंतप्रधान कृषी पिक विमा योजनेत राज्य सरकार मधील चाणक्यांनी व कृषी खात्याच्या झारीतील शुक्राचार्यांनी कृषी विमा कंपन्यांबरोबर संगनमत करून शेतकऱ्यां ऐवजी विमा कंपन्यांचे हित साध्य करणारे नियम करून एकिकडे एका दशकात विमा कंपन्या कोट्याधीश केल्या तर दुसरीकडे शेतकरी कंगाल केला. याला सर्वस्वी जबाबदार तत्कालिन राज्य सरकार व त्यांच्या सुरात सूर मिसळणारा राज्य कृषी विभाग जबाबदार आहे. शेतकर्यासाठी आधारवड ठरलेली केंद्र सरकारची मुळ पंतप्रधान पिक विमा योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र राज्यात आयुर्विमा महामंडळा प्रमाणे महाराष्ट्र राज्य कृषी पिक विमा महामंडळाची स्थापना करुन पंतप्रधान पिक विमा योजनेचा मुळ उद्देश सफल करण्यात यावा, अशी मागणी प्रा. डॉ.नामदेव सानप यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कडे निवेदनाद्वारे केली आहे.

या संदर्भात प्रा.डॉ. नामदेव सानप यांनी राज्याचे मुख्यमंत्री मा.देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शेतकर्यांसाठी आधारवड ठरणारी व कृषी पिकांना आर्थिक संरक्षण देण्याची क्षमता असणारी पंतप्रधान कृषी पिक विमा योजना केंद्र सरकार द्वारे २०१५-१६ पासून सुरू केली. या योजनेला प्रचंड प्रमाणात प्रतिसाद देशातील शेतकऱ्यांनी दिला.

केंद्र सरकारच्या मुळ पंतप्रधान कृषी पिक विमा योजनेचा फायदा शेतकऱ्यांना होऊ लागलाअसतांना महाराष्ट्र राज्य सरकार मधील काही चाणक्यांनी विमा कंपन्यांच्या शुक्राचार्याशी संगणमत करुन केंद्र सरकारच्या मुळ विमा योजनेतील नियम, ट्रिगर, हवामान, उष्णता, पर्जन्यवृष्टी प्रमाणात तत्कालीन राज्यसरकार व कृषी विभागाच्या वतीने बदलून हि योजना विमा कंपन्यांच्या हिताची केली. शेतकऱ्यांच्या नावावरअवघ्या एका दशकात कृषी विमा कंपन्यां करोडो रुपये कमवून मालामाल झाल्या व शेतकरी कंगाल झाला.

महाराष्ट्र राज्यातील कृषी पिक विमा कंपन्याच्या शेतकरी विरोधी धोरणाबद्दल राज्यातील शेतकऱ्यांतअसंतोष निर्माण झाला व हळुहळू शेतकरी या योजना पासून दुरावत चालला हे लक्षात घेऊन राज्याचे विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंतप्रधान कृषी पिक विमा योजना बाबत नवीन धोरण राबविण्याचा निर्णय घेतला आहे तो स्वागतार्थ आहे.

महाराष्ट्र राज्यात नव्याने पंतप्रधान कृषी पिक विमा योजना प्रभावीपणे राबवून देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे समृद्ध शेतकरी व संरक्षित शेती हे स्वप्न साकार करण्यासाठी आयुर्विमा महामंडळा प्रमाणे महाराष्ट्र राज्यात कृषी पिक विमा महामंडळाची स्थापना करण्यात यावी व स्वतंत्र यंत्रणे द्वारे या योजनेची अंमलबजावणी करण्यात यावी,या योजनेतून खाजगी विमा कंपन्यां वगळण्यात याव्यात तसेच पर्जन्यवृष्टी ची आकडेवारी जिल्हा महसूल विभागाने प्रमाणित केलेली स्विकारण्यात यावी असे ही प्रा. डॉ. नामदेव सानप यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कडे दिलेल्या निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

फलोत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण देण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधान कृषी फळपीक विमा योजना सुरू केली. या योजनेत शेतकरी सहभागी झाले परंतु या योजनेच्या मुळ नियमात बदल करून हि योजना अधिकतम विमा कंपन्यांच्या हिताची केली गेली आहे. शेतकऱ्यांचा हिस्सा प्रमाण वाढवले त्यामुळे या योजनेपासून ही शेतकरी दुरावले. २०१५-१६ची मुळ फळपीक विमा योजना पुन्हा सुरू करण्यात यावी व मुळ योजना नुसार शेतकरी हिस्सा घेण्यात यावा. व सर्व हवामान, ट्रिगर, पर्जन्यवृष्टी प्रमाण पूर्वीप्रमाणे ठेवावेत, अशी मागणी प्रा.डॉ. नामदेव सानप यांनी आपल्या निवेदनात केली आहे.

# केकतपांगरी तांड्यावर देशी-विदेशी दारूसह हातभट्टी दारूचा महापूर!

## ■ खांडवी तांड्यावरून केकतपांगरी तांड्यावर हातभट्टी दारू पोहोच करणारा डिलिव्हरी बॉय कोण?

## ■ बीट अंमलदार कारवाई करण्याऐवजी हप्ता वसुलीत अधिक व्यस्त; नागरिकांतून चर्चा?

## ■ सपोनि प्रविणकुमार बांगर यांनी लक्ष घालून अवैध दारू बंद करण्याची महिलांची मागणी!

## ■ अवैध दारू विक्री होत असल्याने नागरिकांच्या जीवनात भीती आणि असुरक्षितता निर्माण?



गेवराई । प्रतिनिधी

गेवराई पोलीस ठाण्याच्या हद्दितील केकतपांगरी तांड्यावर विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणात अवैध देशी विदेशी दारू सह हातभट्टी दारू विक्री जोमाने सुरू आहे. खांडवी तांड्यावरून हातभट्टी दारू पांगरी तांड्यावर पोहोच होत आहे. मग हा हातभट्टी दारू पोहोच करणारा डिलिव्हरी बॉय कोण? याकडे संबंधित बीट अंमलदार कानाडोळा करत असल्यामुळे नागरिकांत असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे बीट अंमलदार दारू विक्रेत्यांवर कारवाई करण्याऐवजी हप्ता वसूल करण्यात मग्न असल्याचा आरोप स्थानिकच्या नागरिकांनी केला आहे. यामुळे अवैध दारू विक्रेत्यांना प्रोत्साहन मिळत आहे. गेवराई पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण कुमार बांगर यांनी याकडे लक्ष घालून, होणारी अवैध दारू बंद करावी आणि संबंधित बीट अंमलदार यांची चौकशी करून कारवाई करावी अशी मागणी स्थानिकच्या नागरिकांनी केली आहे.

अवैध दारू विक्रेत्यांवर पोलीस प्रशासनाकडून तातडीने आणि कठोर कारवाई करणे आवश्यक आहे. परंतु तसे न करता दारू विक्रेत्यांना पोलिसांचा पाठबळ मिळत असल्याचे नागरिकांकडून बोलले जात आहे. तसेच पोलीस प्रशासनाने नागरिकांचा विश्वास आणि समाधान मिळवण्यासाठी अवैध दारू विक्री करणाऱ्यांवर कारवाई करावी अशी, मागणी स्थानिक नागरिक करत आहे. केकत पांगरी तांड्यावर अवैध देशी विदेशी दारूसह हातभट्टी दारू राजरोसपणे विक्री सुरू आहे. याचा सामान्य नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. मात्र संबंधित बीट अंमलदार आणि दारू विक्रेते यांच्यात संगणमत असल्याने याबाबत कारवाई होत नसल्याचे सांगितले जात आहे. मग याबाबत आम्ही तक्रार करायची कुठे? असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहे. विशेष म्हणजे बाहेरगावातून हातभट्टीची दारू एकच पांगरी तांड्यावर पार्सल येत आहे. मग हा हातभट्टी दारू पार्सल करणारा डिलिव्हरी बॉय कोण? याचा शोध घेणे गरजेचे आहे. तसेच संबंधित बीट अंमलदार या डिलिव्हरी बॉयचा शोध घेऊन कारवाई करणार का? हे पाहणं देखील महत्त्वाचं ठरणार आहे.



अनेकजण दारूच्या व्यसनात गुरफटल्यामुळे अनेकांचे संसार उघड्यावर आले आहे. दारूमुळे घरा-घरात भांडणाचे प्रकार वाढले असून, अवैध दारूची विक्री थांबविण्यासाठी कुणीही पुढाकार घेत नसल्यामुळे नागरिकांत नाराजीचा सूर उमटत आहे. मिळेल त्या ठिकाणी रोजंदारी करून आलेली मजुरी दारूवर खर्च करीत आहेत. यामुळे अनेक महिलांचे संसार उद्ध्वस्त होत आहे. रात्री उशिरापर्यंत दारूची विक्री करण्यात येते. दारू विक्रेत्यांकडून 'मलिदा' मिळत असल्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्यात पोलीस प्रशासन कानाडोळा करीत असल्याचा आरोप सुद्धा स्थानिक नागरिक करीत आहे.

### अवैध दारू विक्री जोमात पोलीस प्रशासन कोमात : अनिल राठोड



गेल्या २०१६ पासून मी केकत पांगरी तांड्यावरील अवैध दारू बंद करण्यासाठी आवाज उठवत आहे. तसेच त्यावेळी मी स्वतः पोलीस अधीक्षक यांच्याकडे तक्रार देखील केलेली आहे. अवैध दारू विक्री थांबविण्यात यावी, यासाठी संबंधित विभागाकडे तक्रारी अनेक वेळा दिल्या परंतु याबाबत पाठपुरावादेखील करण्यात आला होता. परंतु त्याचा काहीच उपयोग झालेला दिसत नाही. परंतु त्या तक्रारीवर पोलीस प्रशासनाकडून कुठलीही कारवाई झाली नाही. तरीपण पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत साहेब यांनी याप्रकरणी लक्ष घालून केकत पांगरी तांड्यावरील अवैध देशी विदेशी दारूसह हातभट्टी दारू बंद करावी. या दारूमुळे अनेक महिलांचे संसार उद्ध्वस्त होत आहेत. तसेच घराघरात भांडणाचे प्रकार वाढत आहेत. विशेष म्हणजे दारू विक्रेते आणि संबंधित बीट अंमलदार यांच्यात आर्थिक तडजोड होत असावी, म्हणूनच ही अवैध दारू बंद होत नसावी. अशी आम्हाला शंका आहे. यामुळे पोलीस प्रशासनाने आम्हाला सहकार्य करून केकत पांगरी तांड्यावरील अवैध दारू पूर्णपणे बंद करून महिलांचे उद्ध्वस्त होणारे संसार वाचवावे, अशी, मागणी अनिल राठोड यांनी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्याकडे केली आहे.

# टाकरवण येथे पावणे पाच कोटी खर्चून ही विकतच्या पाण्याने भागवावी लागते तहान

## जलजीवनच्या बोगस कामाच्या चौकशीसाठी ग्रा.पं. समोर महिलांचे धरणे आंदोलन



टाकरवण । प्रतिनिधी

टाकरवन येथे राबवलेली पाणीपुरवठा योजना बोगस भ्रष्ट असून पावणे पाच कोटी खर्चुन ही गावकऱ्यांना पाणी भेटत नाही. इस्टिमेट नुसार काम न झाल्याने पाणी टंचाईचा सामना कराया लागत आहे पावणे पाच कोटी रुपये खर्चुन मोजे टाकरवन येथे पाणीपुरवठा योजना राबविण्यात आली आहे. अपूर्ण कामामुळे नळाला पाणी येत नसल्याने भर उन्हाळ्यात पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. गावकऱ्यांना विकतच्या पाण्यावर तहान भागवी लागते. तेव्हा बोगस कामाची चौकशी करावी पिण्यासाठी पाणी द्यावे. यासाठी वारंवार जिल्हाधिकारी पाणीपुरवठा विभाग व आमदार यांच्याकडे मागनी करूनही मागणी पूर्ण होत नसल्याने महाराष्ट्र दिना दिवशीच टाकरवन ग्रामपंचायत कार्यालय येथे गावकऱ्यांच्या वतीने धरणे आंदोलन सुरू करण्यात आले.

पिण्यासाठी पाणी द्या असे म्हणत ग्रामपंचायत समोर हंडा मोर्चा काढून मानवी हक्क अभियान तालुका सचिव कपिल आडागळे व गावातील महिलांनी आक्रमक पवित्रा घेतल्याने टाकरवन चा पाणी प्रश्न पेटला आहे. माजलगाव तालुक्यातील टाकरवन है अंदाजे १५ हजार लोकसंख्येचे गाव आहे. टाकरवन गावांतर्गत कोणत्याच सार्वजनिक ठिकाणी नळाचे कलेक्शन दिलेले नाही. तरी टाबरवन अंतर्गत सार्वजनिक ठिकाणी नळ कनेक्शन देण्यात यावे, तातडीची पाणी पुरवता म्हणून गावांतर्गत टँकरद्धारे पाणी उपलब्ध करून देण्यात यावे.

पाईपलाईन करताना गावातील सिमेंट रस्त्याचे नुकसान झाले होते ते पूर्ण सिमेंट रस्ते तयार करून देण्यात यावेत. तसेच पाणीपुरवठा योजनेची उच्चस्तरीय समिती गठीत करून चौकशी करण्यात यावी. या योजनेतून उभारलेली पाण्याची टाकी, शुद्धीकरनासाठी ऊभारलेले फिल्टर, विहीर शोभेची वस्तू बनली आहेत. अनेक घरापर्यंत नळ कनेक्शन पोहचले नाहीत चौकशी करा अशी मागणी करण्यात आली आहे.

# बीडकरांना महिनाभर नळाला पाणी नाही, व्हाल्ववर पाणी भरण्याची वेळ

## पाण्याअभावी बीडकरांचे हाल निषेधार्थ अजितदादांच्या प्रतिमेला अभ्यंग स्नान लक्ष्यवेधी आंदोलन

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील जनतेला महिनाभरापासून नळाला पाणी आलेले नसल्याने पाणीबाणी सुरू असुन ११४ कोटी रुपयांची अमृत अटल योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिकारी आणि मे.प्रगती कन्स्ट्रक्शन लातुर यांनी २ वर्षं कालमर्यादा असतानाही ७ वर्षे उलटूनही अद्याप रखडलेल्या अवस्थेत असल्याने कारवाई करण्यात यावी तसेच पाणीपुरवठ्यासाठी महावितरणच्या ३३ कोटी रूपये थकबाकी साठी जिल्हा नियोजन समिती अथवा राज्याच्या वित्त विभागातुन तरतूद करण्यात यावी. बीडकरांची तहान आणि घशाची कोरड हे लोकप्रतिनिधी, प्रशासन आणि ठेकेदार जलयोजनेचे मारेकरी आहेत. उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री तथा पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांनी बीडकरांना वाऱ्यावर सोडले असुन पाण्याअभावी बीडकरांचे हाल होत असुन केवळ बीडच्या पाणीपुरवठ्यासाठी बैठकांचा फार्स होत असुन यांच्या निषेधार्थ

आणि बीड शहराला नियमित व सुरळीत पाणीपुरवठा करण्यात यावा या प्रमुख मागणीकडे लक्ष्य वेधण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.०५ सोमवार रोजी बीड शहरातील राजीव गांधी चौक परीसरातील




नारायणी इंग्लिश स्कूल समोरील व्हाल्ववर पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांच्या प्रतिमेला अभ्यंगस्नान लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात येऊन जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांना निवेदन देण्यात आले. यावेळी आंदोलनात शेख युनुस, सुदाम तांदळे, शेख मुबीन, शेख मुस्ताक, रामनाथ खोड आणि आप जिल्हाध्यक्ष अशोक येडे सहभागी होते.

शहरी भागात प्रतिमाणसी प्रतिदिन १३५ लिटर पाणी मिळावे असा दंडक आहे. परंतु बीडकरांना महिन्यांपासून नळाला पाणी नाही. रखरखत्या ऊन्हात सुर्य आग ओकत असताना बीडकरांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागते. शहरासाठी बिंदुसरा धरणातुन एक, माजलगाव धरणावरून माजलगाव बक वाटर आणि अमृत अटल अशा ३ योजना आहेत. परंतु लोकप्रतिनिधी व प्रशासकीय अधिकारी यांचे दुर्लक्ष असुन नगरपालिका, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि काम करणाऱ्या मे प्रगती कन्स्ट्रक्शन या ठेकेदार यंत्रणांच्या हलगर्जीपणामुळे पाणी योजनेचा बोजवारा उडाला असुन ऐन भर उन्हाळ्यात दुरूस्तीच्या कामामुळे अनेक भागात महिनाभरापासून नळाला पाणी नसल्याने पाणीबाणी सुरू आहे.

बीड शहरासाठी ११४ कोटी रुपयांची अमृत अटल योजना महाराष्ट्रजीवन प्राधिकरण आणि मे.प्रगती कन्स्ट्रक्शन लातुर यांच्या हलगर्जीपणामुळे २ वर्षे कालमर्यादा असताना अद्याप ७ वर्षे उलटूनही रखडलेल्या अवस्थेत आहे. त्यामुळे बीडकरांना तिव्र पाणीटंचाईस सामोरे जावे लागत असुन संबंधितांवर कठोर कारवाई करून काम पूर्ण करण्यात यावे. तसेच बीड शहराला नियमित पाणीपुरवठ्यासाठी महावितरणच्या ३३ कोटी रुपये थकबाकीसाठी जिल्हा नियोजन समिती अथवा राज्याच्या वित्त विभागातुन तरतूद करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT